महाराष्ट्र शासन

जिल्हा परभणी जाहिरात क्रमांक ३ दिनांक 10/6/2015

जिल्हा स्तरावरील कंत्राटी पध्दतीने भरावयाच्या पदांची जाहिरात

(शासन निर्णय क्रमांक डब्ल्युक्युएम-२०१४/पत्र क्रं.५९/पापु-१२)

वाचा:- १. शासन निर्णय क्रं. : डब्ल्युक्युएम-२०१०/पत्र क्रं.९५/पापु-१२ दिनांक ०३.०३.२०१२)

२. शासन निर्णय क्रं. : डब्ल्युक्युएम-२०१२/पत्र क्रं.१८८/पापु-१२ दिनांक २६.११.२०१२)

३. शासन निर्णय क्रं. : डब्ल्युक्युएम-२०११(११)/६/२०१डब्ल्युएसडी पापु-१२ दिनांक १६.०६.२०१४)

४. शासन निर्णय क्रं. : डब्ल्युक्युएम-२०१४/पत्र क्रं.०९/पापु-१२ दिनांक १६.०६.२०१४)

५. शासन निर्णय क्रं. : डब्ल्युक्युएम-२०१२/पत्र क्रं.९५/पापु-१२ दिनांक ०७.१०.२०१४)

६. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचना (uniform Drinking water quality monitoring protocol )

७. शासन निर्णय क्रं. : डब्ल्युक्युएम-२०१२/पत्र क्रं.०८/पापु-१२ दिनांक १८.१२.२०१४)

पाणी गुणवत्ता सनियंत्रण व सर्वेक्षण कार्यक्रमांतर्गत पाणी गुणवत्ता तपासणी करण्यासाठी निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात व कंत्राटी पध्दतीने खालील पदांची भरती करण्यांत येणार आहे. त्यासाठी पात्र व इच्छुक उमेदवाराकडुन अर्ज मागविण्यांत येत आहेत. भविष्यांत या पदावर शासनामध्ये कायम करण्याचा हक्क उमेदवारास सांगता येणार नाही. या अटीवर उमेदवाराने अर्ज भरावा. भरावयाच्या पदाचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

**पदांचे नांव ,वेतन , अर्हता, अनुभव बाबत तपशिल**

| अ.क्रं. | पदांचे नांव | पद संख्या | आरक्षण | मासिक वेतन (रुपये) | शैक्षणीक अर्हता | अनुभव |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | रसायणी | २ | अ.जा. — १<br>अ.ज. — १ | १२०००/- | बी.एस्सी.(रसायनशास्त्र) MS-CIT उत्तीर्ण, प्राधान्य- एम.एस्सी - (रसायनशास्त्र) | प्रयोगशाळेतील पाणी नमुने तपासणीचा / पाणी गुणवत्ता विषयक कामाचा किमान १ वर्षाचा अनुभव |
| २ | अनुजैविक तज्ञ | २ | अ.जा. — १<br>अ.ज. — १ | १२०००/- | बी.एस्सी.(सुक्ष्मजीवशास्त्र) MS-CIT उत्तीर्ण, प्राधान्य- एम.एस्सी सुक्ष्मजीवशास्त्र) | प्रयोगशाळेतील पाणी नमुने तपासणीचा / पाणी गुणवत्ता विषयक कामाचा किमान १ वर्षाचा अनुभव |
| ३. | प्रयोगशाळा सहाय्यक | ५ | अ.जा.-१,<br>अ.ज.-१,<br>खुला-३ | ८०००/- | एच.एस.सी.उत्तीर्ण (विज्ञान शाखा) व पदविधर असणा-यास प्राधान्य | प्रयोगशाळेतील पाणी गुणवत्ता विषयक काम करणा-यास प्राधान्य |
| ४. | प्रयोगशाळा मदतनीस | १ | अ.ज.-१ | ६०००/- | एस.एस.सी. उत्तीर्ण | प्रयोगशाळेतील पाणी गुणवत्ता विषयक काम करणा-यास प्राधान्य |

उपरोक्त प्रमाणे शैक्षणीक अर्हता पात्रता व अनुभव धारक उमेदवारांनी सोबतच्या नमुन्यात अर्ज आवश्यक कागदपत्रांचा सत्यप्रती सदस्य सचिव, वरिष्ठ भूवैज्ञानिक भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, प्रशासकीय इमारत, परभणी येथे जाहिरात प्रसिध्द झाल्यापासुन दिनांक 22/6/2016. पर्यंत सुट्टीचे दिवस वगळता कार्यालयीन वेळेत प्रत्यक्ष अथवा टपालाव्दारे सादर करावा. विहित मुदतीनंतर आलेल्या अर्जाचा स्विकार केला जाणार नाही.

अर्ज शुल्क :-

अर्जासोबत सर्वसाधारण प्रवर्गातील उमेदवारानी रुपये २००/- (अक्षरी रुपये दोनशे फक्त ) व मागासवर्गीय उमेदवारांने रुपये १००/- (अक्षरी रुपये शंभर फक्त ) चा राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा परभणी यांचे नांवे सादर करणे आवश्यक आहे. तसेच धनाकर्ष (डीडी) च्या मागील बाजुस उमेदवाराचे पुर्ण नांव व भ्रमणध्वनी (मोबाईल ) क्रमांक स्वतःच्या अक्षराने लिहीने आवश्यक आहे.

माजी सैनिक उमेदवारांनी परिक्षा शुल्क भरण्याची आवश्यकता नाही. परिक्षा शुल्क भरण्याचा कालावधी दिनांक 13/6/2016. ते दिनांक 22/6/2015 रोजी ५.०० वा. पर्यंत असा राहील. या तारखेनंतर भरलेले परिक्षा शुल्क ग्राहय मानले जाणार नाही. अर्ज शुल्काची रक्कम नापरतावा राहील.

वयामर्यादाः-

१. जाहिराती नमुद सर्व पदांसाठी उमेदवाराचे वय अर्ज स्विकारण्याच्या शेवटच्या दिनांकास १८ वर्षापेक्षा कमी नसावे तसेच सर्वसाधारण प्रवर्गातील उमेदवारांसाठी ३३ पेक्षा जास्त नसावे.मागासवर्गीसाठी उच्चतम वयोमर्यादा ३८ वर्ष अखेर ग्राहय धरण्यांत येईल.

२. उमेदवारांच्या वयाची किमान व कमाल मर्यादा ही अर्ज करावयाच्या दिनांकास म्हणजे दि 23/6/2016 अखेर ग्राहय धरण्यांत येईल.

## जिल्हास्तर भरती प्रक्रियांचा तपशिल भरती प्रक्रियेची पध्दत

जिल्हास्तरावरुन भरती करावयाच्या अणुजैविक तज्ञ, रसायनी, प्रयोगशाळा सहाय्यक व प्रयोगशाळा मदतनीस यांची खालील प्रमाणे अनूक्रमे ( Merit List) यादी निश्चित करण्यांत येईल.

१. राष्ट्रीय ग्रामिण पाणी गुणवत्ता संनियंत्रण व सर्वेक्षण कार्यक्रमांतर्गत मंजूर कंत्राटी मनूष्यबळाची भरती करतांना शैक्षणीक अर्हता व अनूभव प्राप्त उमेदवारांची लेखी परिक्षा घेण्यांत येईल.

२. लेखी परिक्षा मध्ये मि ळालेल्या गुणांच्या आधारे १.१० (सर्वोच्च गुण मिळविणारे १० उमेदवार ) या प्रमाणांत उमेदवारांना मुलाखतीसाठी आमंत्रित करण्यांत येईल.

३. मुलाखतीमधील प्राप्त गुणानूक्रमानूसार उमेदवारांची निवड यादी १ : ५ या प्रमाणे प्रतिक्षा यादी करण्यंत येईल.

४. प्राप्त झालेल्या अर्जाच्या छाननीनंतर पात्र ठरलेल्या उमेदवारांसाठी एकूण ५० गुणांची बहूपर्यायी वस्तूनिष्ठ लेखी परीक्षा राहील. या सर्व उमेदवारांची २५ गुणांची तोंडी परीक्षा घेण्यांत येईल. लेखी परीक्षेमध्ये एकूण ५० प्रश्नांकरीता १ तासाचा कालवधी राहील.

५. अंतिम निवड यादी तयार करतांना ज्या उमेदवांराना समान गुण मिळाल्यास अशा उमेदवांराच्या गुणवत्ताक्रम त्यांचे प्रथम उच्च शिक्षण व तद्नंतर वयाचे जेष्ठ असणा-या उमेदवारांना प्राधान्य देण्यांत येईल.

६. उमेवारांची प्रतिक्षा यादी एकूण पद संख्येच्या २ पट करण्यांत येईल. या प्रतिक्षा यादींची वैधता १ वर्षा पर्यत राहील.या कालावधीत निवड यादीतील उमेदवार हजर न झाल्यास किंवा हजर होवून नोकरी सोडून गेल्यास प्रतिक्षा यादीतील उमेदवारांस गुणाक्रमे कंत्राटी तत्वावर नेमणूक देण्यांत येईल.

**भरती प्रक्रियेतील सर्वसाधारण सुचना :-**

१. संबधित पदासाठी करावयाचा अर्जाचा विहीत नमुना **www.Parbhani.nic.in** या संकेतस्थळावरुन डाऊनलोड करुन वापरावा.

२. उमेदवाराने पोष्टाने किंवा समक्ष अर्ज दिनांक.23/6/2016 पर्यत कार्यालयीन वेळेत सायंकाळी ५.४५ पूर्वी सादर करावा.विहीत कालावधी नतर प्राप्त झालेले /अपूर्ण असलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

३. अर्ज करतांना पाकिटावर ज्या पदासाठी अर्ज केलेला आहे त्या पदाचा ठळक उल्लेख करावा.

४. नैसर्गिक अपत्ती मुळे अथवा अन्य कारणास्तव विहीत दिनांकास कौशल्य चाचणी घेणे शक्य न झाल्यास पूढील दिनांक निश्चित करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद हिंगोली यांना राहील.

५. संबधीत उमेदवारांने अर्ज केल्या नंतर अर्जाची छाननी करुन पात्र /अपात्र असलेल्या अर्जाची अंतिम यादी जिल्ह्याच्या **www.parbhani.nic.in** या संकेत स्थळावर विहीत तारखेस प्रसिध्द करण्यांत येईल.

६. अंतिम यादीवर उमेदवारांचे आक्षेप असल्यास त्यानी आवश्यक त्या पुराव्यासह विहीत कालावधीपूर्वी आक्षेप दाखल करावेत. विहीत मुदती नंतर प्राप्त झालेल्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही.उमेदवारांच्या आक्षेपा प्रमाणे कागद पत्राच्या आधारे शहानिशा करुन पात्र उमेदवारांची अंतिम यादी विहीत कालावधीत प्रसिध्द करण्यांत येईल.

७. उमेदवाराला संबधीत कार्यालयाकडून तातडीने संपर्क करणे,भरती प्रक्रियेतील प्रत्येक स्तरावरील माहिती उमेदवाराला तात्काळ कळविण्यासाठी email पत्ता देणे आवश्यक आहे.भरती प्रक्रियेच्या कालावधीत उमेदवाराने आपला email नियमित उघडावा व माहिती पहावी तसेच उमेदवाराला SMS व्दारे किंवा दूरध्वनी व्दारे संदेश देण्यासाठी संबधीताने मोबाईल क्रमांक देणे अनिवार्य आहे.

८. अंतिम यादी म्हणून कौशल्य चाचणी पात्र ठरविलेल्या उमेदवारांची यादी जिल्हा परिषदेच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्द करण्यांत येईल.तसेच परभणी जिल्हयाच्या **www.parbhani.nic.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यांत येईल.

९. निवड प्रक्रियेत पात्र ठरलेल्या उमेदवारांची मूळ प्रमाण पत्र तपासल्या नंतर त्यांचे कडून करार पत्र करुन घेवून त्यांना नियुक्ती आदेश देण्यांत येईल.

१०.कागदपत्रामध्ये त्रूटी आढळल्यास कोणत्याही स्तरावर उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.किंवा नियुक्ती रद् करण्यंत येवून संबधीत उमेदवारावर कायदेशीर कार्यवाही करण्यांत येईल.

११.मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद परभणी यांना नियुक्ती अधिकारी या नात्याने कोणत्याही उमेदवाराची अंतिम निवड करण्याचे अथवा नाकारण्याचे संपूर्ण अधिकार राहील.तसेच वरील पदभरती प्रक्रियेत कोणताही किंवा केव्हाही बदल करण्याचा,पदसंख्येत बदल. करण्याचा अथवा भरती प्रक्रिया रद् करण्याचे संपूर्ण अधिकार राहतील.

१२.जिल्हास्तरावरील कंत्राटी पदभरतीचा कार्यक्रम /प्रक्रिया खालील वेळापत्रका प्रमाणे राहील.या प्रक्रियेत अपवादात्मक परिस्थितीत बदल करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना राहतील.

| अ.क्र. | तपशिल | दिनांक |
|---|---|---|
| १. | वर्तमान पत्रात जाहीरात देणे | १०/६/२०१६ |
| २. | अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक (सायंकाळी ५.४५ वाजे पर्यत ) | २२/६/२०१६ |
| ३. | प्राप्त अर्जाची छाननी व पात्र उमेदवारांची अंतिम यादी जाहीर करणे | २४/६/२०१६ |
| ४. | अंतिम यादी बाबत उमेदवारांचे आक्षेप/हरकती साठी शेवटचा दिनांक | २८/६/२०१६ |
| ५. | पात्र उमेदवारांची अंतिम यादी जाहीर करणे ,कौशल्य चाचणीसाठी यादी जाहीर करणे | ३०/६/२०१६ |
| ६. | पात्र उमेदवारांचे कौशल्या चाचणी धेणे व कौशल्य चाचणी उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांचे अंतिम निवड यादी जाहीर करणे. | १२/७/२०१६ |
| ७. | पात्र उमेदवारांची मुळ कागदपत्रांची छाननी करुन नियुक्ती आदेश देणे | १५/७/२०१६ |

१३.उमेदवारांना संबधीत पदासाठी करावयाच्या अर्जाचा विहीत नमुना,सुचना,जाहीरातीचा तपशिल,पदासाठी लागणारी शैक्षणीक आर्हता,अनूभव,अर्थिक मोबदला,आणि परभणी जिल्हयाच्या **www.Parbhani.nic.in** या संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यांत येत आहे.

१४.टपालाने अर्ज करतांना पाकिटावर उमेदवांराचे नांव पदाचे नांव,प्रवर्ग नमुद करुन मुख्य कार्यकारी अधिकारी,ग्राम पंचायत विभाग जिल्हा हिंगोली यांच्या पत्यावर पाठवावे. मुदती नंतर टपालाने प्राप्त होणा-या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

१५.वरील पदांच्या नेमणूका निव्वळ तात्पूरत्या स्वरुपात ६ महिने व ५ महिने या प्रमाणे दोन टप्यात तीन कार्यालयीन दिवसांचा तांत्रिक खंड देवून ११ महिन्याच्या कालावधीसाठी राहील.कंत्राटी पध्दतीने नियुक्त केलेल्या कर्मचा-यांचे कार्यमुल्यमापन करुन काम समाधानकारक आढळल्यास त्यांना तीन कार्यालयीन दिवसांचा तांत्रिक खंड देवून पूढील ०६ महिने व ०५ महिने या प्रमाणे दोन टप्यात मूदतवाढ देता येईल.

**अर्जासोबत जोडावयाच्या कागदपत्राच्या सत्यप्रती :-**

- शैक्षणीक पात्रतेसंदर्भात १०,१२ वी /पदवी/पदवीतोर प्रमाण पत्र ई.
  १०,१२ वी /पदवी/पदवीत्तोर गुणपत्रिका (मार्क लिस्ट )
  वयाचा पूरावा
  जातीचा दाखला/क्रिमीलेअर प्रमाण पत्र
  अनूभवाचे प्रमाण पत्र
  पुरस्कार /प्रशस्तीपत्रके
  इतर अनूषंगिक प्रमाण पत्रे
  बॅकेचा धनाकर्ष/चलनाची प्रत

(टिपः- वेळोवेळी शासनाकडून प्राप्त होणा-या मार्गदर्शक सुचनांनूसार भरती प्रक्रीयेमध्ये बदल केले जातील.तशा सुचना सदर संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील. )

सदस्य सचिव तथा
वरिष्ठ भूवैज्ञानिक
भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा
परभणी.

अध्यक्ष तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद परभणी.

# अर्जाचा नमुना

टिप : अर्जदाराने अर्जातील सर्व माहिती भरणे आवश्यक आहे. या जाहिरातीतील विहित नमुन्यात नसलेले अर्ज, अपूर्ण माहिती भरलेले अर्ज, अव्यवस्थीत असलेले अर्ज व विलंबाने प्राप्त झालेले अर्ज अपात्र ठरविण्यात येतील.

| फक्त कार्यालयीन उपयोगाकरिता | |
|---|---|
| अर्जाचा कार्यालयीन नोंदणी क्रमांक | |

उमेदवाराचा अलिकडच्या काळातील पासपोर्ट साईज छायाचित्र स्वसाक्षांकीत करुन येथे चिकटवावे.

१. पदाचे नांव : ....................................

२. उमेदवाराचे संपूर्ण नांव (आडनांव प्रथम) : ....................................

३. लिंग (पुरुष / स्त्री) : ....................................

४. जन्म तारीख : ....................................

(दि.२४/३/२०१६ रोजी वय) वर्षे .......... महिने ..........दिवस ..........

५. संपूर्ण पत्ता : ....................................................

संपर्कासाठी दुरध्वनी क्रमांक (STD कोडसह):.................. भ्रमणध्वनी : ....................

ई-मेल आयडी : ....................................................................

६. अ) जात : .......................... जातीचा प्रवर्ग : ..........................

७. अर्जदार विवाहित / अविवाहित ✓ अशा खुण करावी

| विवाहीत | | अविवाहीत | |
|---|---|---|---|

८. शैक्षणीक / तांत्रिक पात्रता :

| परिक्षेचे नांव | मंडळ/विद्यापीठ संस्था | उत्तीर्ण वर्षे | विषय | गुणांची टक्केवारी | अर्जासोबत सत्यप्रत जोडली असल्यास ✓ अशी खुण करा |
|---|---|---|---|---|---|
| एस.एस.सी. | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

९. अनुभव :

| अ. क्र. | काम केलेली संस्था व पत्ता | कामाचा कालावधी | | पदाचे नांव व वेतनश्रेणी | कामाचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|
| | | पासुन | पर्यंत | | |
| | | | | | |

प्रतिज्ञापन : मी असे प्रमाणीत करतो/करते की, प्रस्तुत पदाची जाहीरात/नमुद शासन निर्णय वाचले असुन, त्यातील पदाविषयक माहिती मी काळजीपूर्वक वाचली असुन, ती मला समजली आहे व मला ती मान्य आहे. सदर परिक्षेस प्रवेश मिळविण्यासाठी नमुद केलेल्या सर्व अटी व शर्तीची मी पूर्तता करतो/करते याची मी खात्री केली आहे. या अर्जात दिलेली माहिती माझ्या माहितीप्रमाणे बरोबर व खरी आहे. तसेच अर्जात दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळल्यास त्याच माहितीच्या आधारे मला दिलेला प्रवेश रद्द होईल आणि मिळालेली नोकरी गमावण्यास मी बांधील राहीन व पुढील योग्य त्या कार्यवाहीस जबाबदार राहिन याची मला पूर्ण जाणीव आहे.

स्थळ :

दिनांक :

उमेदवाराची स्वाक्षरी